**प्रीह विहार येथील संवर्धन सुविधांना झालेल्या नुकसानीबाबत प्रसारमाध्यमांच्या प्रश्नांवर अधिकृत प्रवक्त्यांची प्रतिक्रिया**

12 डिसेंबर 2025

प्रीह विहार येथील संवर्धन सुविधांना झालेल्या नुकसानीबाबत प्रसारमाध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना अधिकृत प्रवक्ते श्री. रणधीर जैस्वाल यांनी पुढीलप्रमाणे प्रतिक्रिया दिली:

थायलंड–कंबोडिया सीमेवरील सध्याच्या संघर्षांच्या काळात प्रीह विहार येथील संवर्धन सुविधांना होणाऱ्या नुकसानीबाबत बातम्या आम्हाला प्राप्त झाल्या आहेत.

संवर्धन सुविधांना होणारे कोणतेही नुकसान दुर्दैवी असून, ही चिंतेची बाब आहे.

प्रीह विहार मंदिर हे युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांपैकी एक असून, ते संपूर्ण मानवजातीचा सामायिक सांस्कृतिक वारसा आहे. या स्थळाच्या संवर्धनासाठी भारत सक्रियपणे सहभागी राहिला आहे. या स्थळासह संबंधित संवर्धन सुविधांचे संपूर्ण संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी आम्हाला आशा आहे.

उभय बाजूंनी संयम बाळगावा, संघर्ष रोखण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत आणि परिस्थिती अधिक गंभीर होऊ नये याची खबरदारी घ्यावी, असे आम्ही पुन्हा आवाहन करतो. त्यांनी संवाद व शांततेच्या मार्गावर परत येण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, असे आम्ही आवाहन करत आहेत.

नवी दिल्ली

12 डिसेंबर 2025